VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय लोकशाहीचे स्वरुप व त्यापुढील दहशतवादाचे आव्हान - एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. श्यामसुंदर वाघमारे** | १-४ |
| २ | भिल्ल आदिवासी स्त्रियांच्या शैक्षणिक समस्या (संदर्भ : किनवट तालुका)<br>**प्रा. डॉ. विजया साखरे** | ५-८ |
| ३ | खेळ जगतात संघटन व प्रशासनाचे महत्व<br>प्रा. डॉ. जुझारसिंघ निर्मलसिंघ सिलेदार | ९-१० |
| ४ | भारतीय समाजरचनेती लिंग असमानता : एक सामाजिक समस्या<br>**प्रा. डॉ. संभाजी नारायणराव कबाडी** | ११-१३ |
| ५ | सांप्रदायिकता : समस्या व उपाय<br>**प्रा. सुभाष रामराव रगडे** | १४-१८ |
| ६ | भारतीय लोकशाही व आर्थिक सुधारणा<br>**डॉ. चंद्रकांत वामनराव गजेवाड** | १९-२२ |
| ७ | विस्थापनाचा स्त्रियांवर झालेला परिणाम (संदर्भ लोअर दुधना प्रकल्प)<br>**प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे** | २३-२७ |
| ८ | भारतीय समाजातील स्त्री समस्या - स्त्रीभ्रूणहत्या एक अवलोकन<br>प्रा. गजानन आनंता देवकर | २८-३१ |
| ९ | लोकशाहीचा सिध्दांत आणि भारतीय लोकशाहीच्या संदर्भातील निरीक्षणे<br>**प्रा. डॉ. रामचंद्र गायकवाड** | ३२-४२ |
| १० | भारतीय लोकशाही समोरील आव्हान : पर्यावरण संवर्धन<br>**डॉ. गंगणे जीवन सुदामराव** | ४३-४७ |
| ११ | भारतीय अनुसूचित जातींच्या सामाजिक व आर्थिक समस्या<br>**प्रा. डॉ. गोरे बी. एम.** | ४८-५० |
| १२ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाणे<br>प्रा. डॉ. हिंगोले आर. जी. | ५१-५४ |
| १३ | समाजातील अल्पसंख्याकांच्या समस्या<br>डॉ. जीवन ए. चव्हाण | ५५-५८ |

# ६. भारतीय लोकशाही व आर्थिक सुधारणा

डॉ. चंद्रकांत वामनराव गजेवाड
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्याल, शंकरनगर.

## प्रास्तविक

इंग्रज राजवटीच्याजोखडातून मूक्त झाल्यानंतर भारतीय शासनाने एप्रिल 1951 पासून भारतात पंचवार्षीक योजनांना सुरुवातकेली. या योजनेच्या माध्यमातुन आर्थिकसुधारणा, गरीबीनिर्मुलन, बेरोजगारीनिर्मुलन, आत्मनिर्भरता व उत्पन्नाचे समानवितरणइ. उद्दिष्टेनिर्धारितकरण्यात आली. या धोरणांचाएक भाग म्हणून भांडवलप्रधान मोठया उद्द्योगांना खाजगी क्षेत्रात प्राधान्यदेण्यात आले. पंचवार्षीक योजनेच्या अंतर्गतदेशातविवीध प्रकारची सरकारीनियंत्रणे, परवाना पध्द्ती खासगी विदेशीगुंतवणुकीवर प्रतिबंध लावण्यात आले.करनिती, राजकोषीय, मौद्रिक, औदर्योगिक व विदेशीविनिमयइ. धोरणे सरकारीनियंःत्रणात राबविण्यात आली.

प्रारंभिक काळात हि आर्थिकधोरणेदेशाला फायदेशिर ठरली परंतू पुढेगरजेनुसारत्यात बदलनकेल्यामुळे अनेक समस्या निर्माणझाल्या इतर आशियाई विकसनशिलदेश उदा. चीन, जपान, थाईलंड, द.कोरीया व इंडोनेशिया या राष्ट्रांनी आपली अर्थव्यवस्था आधिक सुधारीत उदारीकृतकरुनजागतीक अर्थव्यवस्था व जागतीक स्पर्धेला अनुकूल बनवून आपला शिघ्रगतीनेविकासघडवून आणला. भारतानेही या बदलत्या परिस्थितीचा फायदाघेण्यासाठी आर्थीक सुधारणाकार्यक्रम राब राबविण्याचे ठरवले.

आर्थिक र..रनेचाएक भाग म्हणून जुलै 1991 पासून भारतातनविन आर्थिकसुधारणाधोरणाला सुरुवातकरण्यात आली या आर्थिकसुधारणाकार्यक्रमाचा पहिला टप्पा 1991 ते 2000 हि वर्षे असुन या पुढील वर्षे या कार्यक्रमाचादुसरा टप्पा आहे. या आर्थिक सुधारणाकार्यक्रमाचे उदारीकरण, खाजगीकरण व जागतीकीकरण हे तीन मुलमंत्र आहेत. यातूनगरीबी, बेकारी व आर्थिक विषमतादुरकरण्याचे प्रयत्नकरण्यात येत आहेत. देशातील सर्व आर्थिक व सामाजिक बाबींचा विचारकरुनतत्कालीन अर्थमंत्रीडॉ. मनमोहन सिंग यांनी आपल्या अर्थसंकल्पातनविन आर्थिकधोरणांचीव्युहरचना जाहिर केली व यातून आर्थिक सुधारणेचाकार्यक्रम अस्तीत्वात आला.

## निती आयोग

भारतात 15 मार्च 1950 रोजीनियोजन आयोगाची स्थापनाकरण्यात आली. यातील 11 पंचवार्षीक योजना पुर्णकरण्यात आल्या. नियोजन आयोगानेआज पर्यंतएकुण12 पंचवार्षीक योजनांची आखणीकेली. यातील 11 पंचवार्षीक योजना पुर्णकरण्यात आल्या या योजनांच्या सफलतेचा व अपयशाचा आढावाघेण्यात आला पणदारिद्रय, बेकारी, आर्थिक विषमता, समता व न्याय या बाबतीतनियोजन आयोग पुरेसा यशस्वी ठरला नाही. 1991 पासूनच्याआर्थिक सुधारणाकाळात

नियोजनाचे महत्व कमी होवू लागले. माजी पंतप्रधानडॉ. मनमोहन सिंग यांनीआपल्या दुसऱ्याकार्यकाळात नियोजन आयोगाच्या कार्याविषयी त्यात सुधारणाकरण्याचे संकेतदिले.

मे 2014 मध्ये सार्वत्रीकनिवडणुका पार पडल्या व त्यानंतरमा. नरेंद्र मोदीदेशाचे पंतप्रधानझाले, त्यांनी श्री अजय छिब्बरयांच्या अध्यक्षतेखालीएक समीतीगठीतकेली व त्यानंतर 13 ऑगस्ट 2014 रोजीभारतीयनियोजन आयोगमोडीतकाढण्यातआला व त्याठिकाणी 1 जानेवारी 2015 मोदी सरकारनेनिती आयोगाची स्थापनाकेली हा निती आयोग पुढील काळासाठी आर्थिकनियोजनाचेकाम पाहणार आहे.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे**

1) भारतीय आर्थिक सुधारणाकार्यक्रमाचीकारणमिमांसाकरणे.

2) भारतीय आर्थिक सुधारणाकार्यक्रमाचे यश अभ्यासणे.

भारतीय शासनाने वेळोवेळी केलेल्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमामुळे देशातील सर्व स्तरावरीलक्षेत्रामध्ये अमुलाग्र बदलझाल्याचेदिसून येतेते खालील प्रमाणे आहेत.

**1. शेती**

भारतीय शेती उत्पादनाच्या बाबतीतजगातदुसऱ्या स्थानावर आहे. शेतीव शेती आधारितक्षेत्राचादेशाच्या सकलघरेलु उत्पादनात 23 टक्के वाटा आहे. भारताच्याएकुणकामगार संख्येत शेतीकामगारांचा 2016 पर्यंत59 टक्के वाटा होता. विविध आर्थिकसुधारणा काळात भारताच्या शेती उत्पादनात वाढ होत गेली व रोजगाराच्यासंधीत वाढझाली. हरितक्रांतीमुळे त्यातजास्तीची भर पडल्याचेदिसून येते.

**2. संरक्षणसिध्दता**

भारताने आर्थिक सुधारणा काळात संरक्षणक्षेत्रात मोठीझेप घेतलेली आहे. भारतात सध्याजगातीलतिसऱ्याक्रमांकाची मिलीट्री फोर्स आहे. भारतीय संरक्षणदलात अनेक आधुनिकक्षेपणास्त्रे, रनगाडे, लढाऊ विमाने यांची भर पडलेली आहे. भारत 2022 सालापर्यंत संरक्षणावर अंदाजे 62 दशलक्षडॉलर्स खर्च करणार आहे.

**3. विद्युतक्षेत्र**

विद्युतनिर्मिती व वापरात भारताने आर्थिक सुधारणा काळात बरीच प्रगती साधली आहे. विज वापरात भारतचिन व अमेरिकेनंतरतिसऱ्याक्रमांकावर आहे. योजना काळात भारतात मोठया प्रमाणातजलविद्युत, औष्णीकविद्युत तसेच अणुउर्जा प्रकल्प स्थापनकरण्यात आलेले आहेत. वर्ष 2013 मध्ये भारत विज उत्पादनातजगाततिसऱ्याक्रमांकाचा जपान व रशियानंतरचादेश बनला होता.

### 4. मोटारनिर्मिती उद्योग

आर्थिक सुधारणा काळात भारताने वाहन निर्मितीक्षेत्रात मोठी मजल मारली आहे. भारतातुन मोठया प्रमाणातकार, ट्रॅक्टरतसेचमोटारीच्या सुटया भागाचे मोठया प्रमाणावर उत्पादन व निर्यात होते. 2016 या वर्षी वाहन उद्योगाचा सकलघरेलू उत्पादन 79 दशलक्षएवढावाटा होता तर 6.76 दशलक्ष लोकांना यातून रोजगार मिळालेला आहे.

### 5. हिरे व दागिणे उद्योग

आर्थिक सुधारणाकाळात हिरे व दागिनेनिर्मिती उद्योगाला मोठीचालना मिळाली या उद्योगातून लाखो लोकांना रोजगार मिळाला तरदेशाला या व्यवहारातून मोठया प्रमाणावरविदेशीचलन प्राप्तहोत आहे. हा उद्योग 2022 साल पर्यंत 110 दशलक्षडॉलर्स पर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. जोकी 2017 साली 60 दशलक्षडॉलरएवढा होता.

### 6. औषध निर्माण उद्योग

लोकांमध्ये आरोग्यविषयक जागरुकतानिर्माणझाल्यामुळे हा उद्योगविकसीत होत आहे तसेच यामागे आर्थिकसुधारणा पण आहेत. विविध योजना काळात शासनाने आरोग्यदायक योजनावर भरदिलेला आहे त्यामुळे आयुर्वेदीक व इरत औषधी उद्योग भरभराटीस आलेले आहेत. भारतातीलगुजरात राज्यातुन मोठया प्रमाणावर औषध निर्मिती व निर्यातकेलीजाते.

### 7. कापड निर्मिती उद्योग

आर्थिक सुधारणाकाळात कापडनिर्मिती उद्योगांनी मोठीझेप घेतलेली आहे. या क्षेत्रानेदेशातील 35 दशलक्ष लोकांना रोजगार मिळवून दिलेला आहे. या उद्योगाचादेशाच्याजीडीपी मध्ये 2 टक्केतरनिर्यातीत 15 टक्के वाटा आहे. वित्तीय वर्ष 2017-18 मध्ये या क्षेत्राने 39.2 दशलक्षडॉलरचीनिर्यातकेली आहे.

### 8. नागरीविमान सेवा

भारत हि जागातीलचौथ्याक्रमांकाचीविमानसेवा मार्केट आहे. 2017 या वर्षात 158 दशलक्षप्रवाशांनी या सेवेचा लाभ घेतलेला आहे. 18 फेब्रुवारी1911 रोजी सुरुझालेल्या या सेवेनेखुप मोठीझेप घेतलेली आहे. आज भारतात अनेक खाजगी विमान सेवाकंपन्याएअर इंडिया सोबतकार्यरत आहेत.

### 9. बॅकींग व वित्त सेवा

आज भारतात सार्वजनीकखाजगी तसेच सहकारी बँकाचे मोठे जाळे पसरलेले आहे या सर्व वित्तीय सेवा संस्थादेशातीलविविधक्षेत्राला मोठया प्रमाणावर भांडवल पुरवठाकरतात यामुळे देशाच्याआर्थिकविकासास मोठीमदतझालेलीआहे. 2016 या वर्षात देशाच्यासकलघरेलु उत्पादनात यांचा 809 दशलक्षडॉलर्सएवढा वाटा होता तर या वर्षी पर्यंत 14.17 दशलक्ष लोकांना यांनी रोजगारदिलेला आहे.

**10. किरकोळ व्यापार**

आर्थिक सुधारणा काळात किरकोळ व्यापारक्षेत्राने मोठीकामगीरीबजावलेली आहे. भारत ही जगातील वेगानेविकसीत होणारी एकमेव किरकोळ बाजारपेठ आहे. सध्या भारतातील किरकोळ व्यापारातई-कॉमर्स चा वाटा 32.7 दशलक्षडॉलर आहे तो 2022 या वर्षा पर्यंत 71.9 दशलक्षडॉलर्स पर्यंतजाण्याची शक्यता आहे.

**11. प्रत्यक्षविदेशीगुंतवणुक**

आर्थिकसुधारणाकार्यक्रमा अंतर्गत शासनाने वेळोवेळी विदेशी गुंतवणुकीला चालना दिलेली आहे परिणामी देशाच्या विविध क्षेत्रामध्ये विदेशी गुंतवणुकीचा प्रवाह वाढत आहे. वर्ष 2000 ते 2010 काळात देशात 178 दशलक्ष डॉलर्स एवढीविदेशी गुंतवणुक झाली तरत्यानंतर 2016 ते 2017 या एकाच वर्षात हि गुंतवणुक 60.1 दशलक्षडॉलर्सएवढी झाली.

**अनुमान**

आंतरराष्ट्रीय आर्थिक पर्यावरण व देशातील अंतर्गतगरजा लक्षातघेतादेशातील कोणत्याही शासनाला आर्थिक सुधारणाकार्यक्रमापासुन मागे हटणे शक्य नाही. भाविकाळात भारताला आर्थिक महाशक्ती बनवायचे असेलतर सुयोग्य आर्थिकनियोजनात योग्यते प्रभावी बदलकरणे आवश्यक आहे. भारतीयनागरीकांच्यादृष्टीकोणात व देशातील असलेल्या आर्थिकक्षमतेचा व मनुष्यकाळाचा योग्य वापरकरुनघेणेआवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणून मा. प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी भारतीयनियोजन आयोगाच्याठिकाणीनवीन प्रारुपातनिती आयोग स्थापनकेलेला आहे. यातुन भारताचा चांगला आर्थिकविकासहोईल अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ सुची**

1. डॉ. काकडे, प्रा. पाचपोर"भारतीय अर्थव्यवस्था", साईनाथ प्रकाशन, नागपूर, जुलै 2014 पेज 71-85.
2. डॉ. एस. के. ढगे, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, के. एस. पब्लीकेशन, पुणे, सप्टेंबर 2015 पेज 191-213.
3. डॉ. पांचाळ पि. व्हि., भारतीय व्यापार व उद्योजकतेचा ईतिहास, अरुणा प्रकाशन, लातुर, फेब्रुवारी 2016 पेज 181-183.
4. डॉ. ए. जाधव डॉ. आर. एस. पाटील, "भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने", (भारतीय अर्थव्यस्थेपुढील आव्हाने), हर्षवर्धन पब्लीकेशन, लिंबगणेश, फेब्रुवारी 2015 पेज 85-88.
5. www.wikipedia, "Economic Liberalization in India", last visted on 15 Feb. 2019.
6. www.wikipedia, "Economy of India," last visited on 15 Feb. 2019.